सत्यमेव जयते

**संचालक फलोत्पादन**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-5**

कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक : 020-25538095

पत्ता : भूजल भवनजवळ, शिवाजीनगर, पुणे - 411005

E Mail ID : agridhrt@gmail.com info@mahanhm.in

|| शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी ||

---

जा.क्र./कृआ./फलो-३/736 /२०२६ दि.२९ /०१/२०२६

**प्रति**

--------------------------------

**हरितगृह व शेडनेटगृह उभारणी करणारे**
**नोंदणीकृत सेवा पुरवठादार**

**विषय :- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत हरितगृह / शेडनेटगृह उभारणी करणा-या सेवा पुरवठादारांच्या नोंदणी / नूतनीकरणाबाबत...**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मराफऔवमं/सं.शेती/७६/२०२५ दि.०१.०१.२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यामध्ये संरक्षित शेती या घटकाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हरितगृह / शेडनेटगृह उभारणी करणा-या कंपनी/ सेवा पुरवठादारांची राज्यस्तरीय नोंदणी प्रक्रिया राबविणेबाबत उपरोक्त संदर्भांन्वये http://maharashtra.mahanhm.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन नव्याने नोंदणीकरिता प्रस्ताव मागवून नोंदणी प्रक्रिया प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

त्याअनषंगाने कळविण्यात येते की, ज्या सेवा पुरवठादारांची नोंदणी / नुतनीकरणाची वैधता माहे डिसेंबर २०२५ अखेर संपुष्टात आलेली आहे किंवा माहे मार्च २०२६ पर्यंत टप्याटप्यात संपुष्टात येणार आहे अशा सेवा पुरवठादारांना या पत्राद्वारे दि.३१.०३.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संबंधित सेवा पुरवठादाराने सुधारित / नवीन बँक गॅरंटी In favour of Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune यांच्या नावे दि.१५.०२.२०२६ पर्यंत संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे या कार्यालयास सादर करावी. अन्यथा आपणांस देण्यात आलेली मुदतवाढ आपोआप रद्द समजण्यात येईल.

तसेच ज्या सेवा पुरवठादारांना सन २०२६-२७ करिता नव्याने नोंदणी / नुतनीकरण करावयाचे आहे अशा सेवा पुरवठादारांनी दि.१५.०३.२०२६ पर्यंत नोंदणीच्या अटी व शर्तींनुसार परिपुर्ण प्रस्ताव संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे या कार्यालयाकडे सादर करावेत.

29/1/2026

(अंकुश माने)
**संचालक, फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, पुणे**

**प्रत :-** १. विभागीय कृषि सहसंचालक, सर्व विभाग, सर्व यांना माहितीस्तव
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व यांना माहितीस्तव

www.MHAlerts.Com



More info: MHAlerts.Com

सत्यमेव जयते

# संचालक फलोत्पादन

## कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-5

कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक : 020-25538095

पत्ता : भूजल भवनजवळ, शिवाजीनगर, पुणे - 411005

दूरध्वनी (०२०) २९७०३२२८

ई-मेल : info@mahanhm.in

**कृषि विभागाच्या विविध योजनेंतर्गत हरितगृह/शेडनेटगृह / केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृहाची उभारणी संरक्षित शेती घटकाच्या मार्गदर्शक सूचना - २०२५-२६ व केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह २०२१-२२ या घटकांच्या मार्गदर्शक सूचनानुसार उभारणी करणाऱ्या सन २०२६-२७ करिता नोंदणीकृत सेवा पुरवठादारांचे नूतनीकरण व नवीन सेवा पुरवठादारांची राज्यस्तरीय नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.**

त्याकरिता सदर प्रक्रियेबाबतची कार्यपध्दती, अटी व शर्ती, आवश्यक कागदपत्रे इ. बाबतचा सविस्तर तपशील https://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

तरी हरितगृह / शेडनेटगृह/ केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह उभारणी करणारे इच्छुक सेवा पुरवठादार यांनी विहित अटी व शर्तींच्या अनुषंगाने नोंदणी करिताचे प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह **संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे - ४११ ००५** या कार्यालयास सादर करावेत. **तसेच नूतनीकरणाचे प्रस्ताव दि.१५ मार्च २०२६ पर्यंत या कार्यालयास सादर करावेत.**

**संचालक, फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, म.रा, पुणे**

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

## संरक्षित शेती घटकांतर्गत हरितगृह, शेडनेटगृह या घटकांची उभारणी करणा-या सेवा पुरवठादारांच्या राज्यस्तरीय नोंदणीच्या अटी व शर्ती

१. हरितगृह/शेडनेटगृहाची उभारणी करुन देणा-या नामांकित सेवा पुरवठादार यांना **संरक्षित शेती घटकाच्या मार्गदर्शक सूचना २०२५-२६ आणि केबल अॅन्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह मार्गदर्शक सूचना २०२१-२२** नुसार प्रशासकीय, वित्तीय, तांत्रिक व इतर अटी व शर्ती लागू राहतील.

२. मार्गदर्शक सूचनांमध्ये वेळोवेळी होणारे बदल तसेच या कार्यालयाच्या परिपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या सूचना सेवा पुरवठादारांना लागू राहतील.

३. **राज्यस्तरावर हरितगृह/ शेडनेटगृह उभारणी करणा-या सेवा पुरवठादारांचे नूतनीकरण व नोंदणी एका वर्षांसाठी ग्राह्य राहील. तसेच वैधता कालावधी संपुष्टात आल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत नूतनीकरणाकरिता प्रस्ताव या कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा संबंधित सेवा पुरवठादारास नव्याने नोंदणी करिता प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.**

४. राज्यस्तरावर हरितगृह/ शेडनेटगृह उभारणी करणा-या सेवा पुरवठादारांचे **नूतनीकरण करताना बँक गॅरंटी (प्रपत्र-४) रुपये २.५० लाख In favour of Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune यांच्या नावे राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड** बँकेत जमा करावी. बँक गॅरटीला व्याजाचा परतावा मिळणार नाही याची नोद घ्यावी.

५. तसेच ज्या सेवा पुरवठादारांना **कामाचा अनुभव नाही किंवा ज्यांना लघु उद्योजक** म्हणून कृषि विभागाच्या योजनेंतर्गत लाभार्थ्यांची हरितगृह / शेडनेटगृह उभारणीची काम करावयाची आहेत. अशा सेवा पुरवठादारांना बँक गॅरंटी (प्रपत्र-४) **रु.३.०० लाख In favour of Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** यांच्या नावे राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँकेत जमा करावी.

६. हरितगृह/शेडनेटगृहाच्या विविध मॉडेलची उभारणी करण्याकरिता विविध घटकांकरिता वापरण्यात येणा-या साहित्याला भारतीय मानांकने (BIS) व तांत्रिक निकष (Technical Specification) मार्गदर्शक सूचनेप्रमाणे लागू राहतील.

७. हरितगृह / शेडनेटगृह उभारणी करणारा सेवा पुरवठादार हा जीएसटी (GST) नोंदणीकृत असावा.

८. शॉप अॅक्ट/ उदयोग आधार/उद्यम प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.

९. सेवा पुरवठादारास हरितगृह/ शेडनेटगृह उभारणीची **कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव** असावा. तसेच मागील ३ वर्षाची उलाढाल **प्रति वर्षी कमीत कमी रु.१००.०० लाख** असावी. त्या पुष्टयर्थ सेवा पुरवठादारास मागील **लगत ३ वर्षाचा सनदी लेखापालाने प्रमाणीत केलेला आर्थिक ताळेबंद (Balance Sheet)** सादर करावा लागेल व वर्षवार यापूर्वी उभारणी केलेल्या हरितगृह/ शेडनेटगृह लाभार्थ्यांच्या याद्या सादर करणे आवश्यक राहील.

१०. जी आय पाईपच्या बाबत **IS 1161 : 2014 (As per BIS Amendment No.2)** या मानांकनाचे **जी आय पाईप, टेपनेट (IS:16008 (Part 1): 2016), मोनोनेट (IS:16008 (Part 1I): 2016), इन्सेक्ट नेट (IS:16513:2016), पॉली फिल्म (IS-15827:2019) व अॅप्रॉन पेपर इत्यादी साहित्याकरिता** राज्यस्तरावर नोंदणीकृत उत्पादकाचे / **अधिकृत** वितरकाचे अधिकृत विक्रेता असल्याबाबतचे प्रमाणपत्र सेवा पुरवठादारास द्यावे लागेल.



www.MHAlerts.com
More info: MHAlerts.Com

११. **जीआय पाईप, ॲल्युमिनिअम प्रोफाईल, टेपनेट, मोनोनेट, इन्सेक्ट नेट, पॉली फिल्म व ॲप्रॉन पेपर** इत्यादी साहित्य बीआयएस मानांकनाप्रमाणे व तांत्रिक निकषाप्रमाणे पुरवठा करण्याबाबतचे **हमीपत्र (प्रपत्र - ५) (५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर)** द्यावे लागेल. त्यासाठी राज्यस्तरावर नोंदणीकृत उत्पादकाचे / अधिकृत वितरकाचे अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. **नेट/फिल्म व ॲप्रॉन पेपर याबाबत १ वर्षाची गॅरंटी (बदलून देणे) व २ वर्षाची वॉरंटी** द्यावी लागेल (सेवा पुरवठादाराच्या स्वखर्चाने दुरुस्ती करुन देणे). तसेच हरितगृह/शेडनेटगृहाच्या **सांगाडयाची पाच वर्षाची वॉरंटी** द्यावी लागेल (सेवा पुरवठादाराच्या स्वखर्चाने दुरुस्ती करुन देणे) (नैसर्गिक आपत्ती, विध्वंसक प्रवृत्ती वा तत्सम कारणे वगळून).

१२. इच्छुक सेवा पुरवठादाराने हरितगृह/शेडनेटगृहाच्या उभारणीतील दोषामुळे/त्रुटींमुळे झालेल्या नियम बाहय नुकसानीकरिता नुकसान भरपाई देणे बंधनकारक राहिल.

१३. पॉलीइथिलीन फिल्मच्याबाबत आयातीत पॉलीइथिलीन फिल्म वापरणार असल्यास **अधिकृत आयातदार किंवा अधिकृत आयातदाराचे वितरक किंवा विक्रेता** असल्याबाबत संबंधित राज्यस्तरावर नोंदणीकृत **आयातदाराचे प्रमाणपत्र** द्यावे लागेल.

१४. पॉलीइथिलीन फिल्मबाबत उत्पादकाने प्रमाणित केलेले तांत्रिक माहितीचे विवरण पत्र (Technical data sheet), पॉलीइथिलीन फिल्मचा दर्जा व गुणधर्माबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१५. **केबल ॲन्ड पोस्ट प्रकारच्या शेडनेटगृहासाठी लागणा-या केबल/वायर रोपचे तांत्रिक माहितीचे विवरण पत्र (Technical data sheet) दर्जा व गुणधर्माबाबतचे प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक राहील.

१६. केबल ॲन्ड पोस्ट प्रकारच्या शेडनेट गृहासाठी साहित्याचे Technical data sheet / Structure Stability Certificate / Report सादर करावे.

१७. सेवा पुरठादारांची नोंदणी ही साहित्य पुरवठ्यासह संपूर्ण हरितगृह/ शेडनेटगृह उभारणीसाठी करावयाची असून केवळ साहित्य पुरवठयासाठी नाही.

१८. **हरितगृह / शेडनेटगृह उभारणी, सिंचन सुविधा, फॉगिंग यंत्रणा व कंट्रोल हेड या घटकांतर्गत साहित्याचा तांत्रिक निकषानुसार पुरवठा करणे व सुस्थितीत परिचलन / कार्यान्वित करुन देण्याची जबाबदार संबंधित सेवा पुरवठादाराची राहील. कंट्रोल हेड अंतर्गत पाण्याची टाकी, फिल्टर संच व पंप संच लाभार्थ्याच्या आवश्यकतेनुसार पुरवठा करावा.**

१९. हरितगृह / शेडनेटगृहाची उभारणी करताना मार्गदर्शक सूचनां प्रमाणे पॉलीफिल्म, टेपनेट, मोनोनेट, इन्सेक्ट नेट, ॲप्रॉन पेपर पिक पध्दतीनुसार साहित्य निवड करण्याचा अधिकार लाभार्थींना राहील.

२०. सेवा पुरवठादार यांनी विहित कालावधीमध्ये हरितगृह/शेडनेटगृह उभारणीचे काम पूर्ण करुन देण्याची जबाबदारी नोंदणीकृत सेवा पुरवठादाराची राहील.

२१. हरितगृह / शेडनेटगृह उभारणी करणा-या नोंदणीकृत सेवा पुरवठादाराने कामाच्या **सद्यस्थितीबाबत त्रैमासिक माहिती (प्रपत्र - ६) व स्टॉक रजिस्टर (प्रपत्र - ७)** या कार्यालयास सादर करावी.

२२. हरितगृह/शेडनेटगृहाची उभारणी करण्यासाठी आवश्यक विविध घटकांचे व साहित्यांचे वाहतुकी दरम्यान / हाताळणी दरम्यान नुकसान झाल्यास सदर साहित्य बदलून देण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील.

www.MHAlerts.com
More info: MHAlerts.Com

२३.हरितगृह / शेडनेटगृह उभारणीचे काम सेवा पुरवठादाराने स्वतः करणे आवश्यक राहील. **तसेच मध्यस्थामार्फत केलेले काम ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

२४.**साहित्य पुरवठा व उभारणी झाल्यानंतर शेतकरी खालीलप्रमाणे देयके सादर करतील.**

**अ) सेवा पुरवठादाराचे साहित्य पुरवठा व उभारणी** (वाहतुक व मजूरी खर्चासह) चे **देयक** व **सेवा पुरवठादाराचे साहित्याचे EWay Bill** सादर करणे आवश्यक राहील. **सेवा पुरवठादाराने लाभार्थ्यास सादर केलेले विहित नमुन्यातील देयकाच्या सत्य प्रतीची खात्री उपविभागीय कृषि अधिकारी यांनी संबंधित सेवा पुरवठादाराकडून ई-मेल द्वारे शहानिशा करुन घ्यावी किंवा मोका तपासणी वेळी सदर देयकाबाबत संबंधित सेवा पुरवठादाराकडून खातरजमा करुन घ्यावी.**

**ब) सिंचन सुविधेंतर्गत सिंचन यंत्रणा, फॉगिंग यंत्रणा व कंट्रोल हेड** या साहित्याचे **कृषि विभागाकडे नोंदणीकृत वितरकाचे देयक** सादर करणे आवश्यक राहील. तसेच सिंचन सुविधेंतर्गत **साहित्याचा खर्च रु.१.०० लाख रक्कमेपेक्षा कमी** असेल तर नोंदणीकृत वितरकाने देयकासोबत **Delivery Challan** जोडणे आवश्यक राहील. जर साहित्याचा **खर्च रु.१.०० लाख रक्कमेपेक्षा जास्त** असेल नोंदणीकृत वितरकाने **देयकासोबत EWay Bill** जोडणे आवश्यक राहील.

वरील सर्व देयके **जीएसटी नोंदणी क्रमांक असलेले पक्के देयके द्यावे लागतील.** त्यामध्ये वस्तु व सेवा कराचा (GST) स्वतंत्रपणे उल्लेख करावा.

**क) संरक्षित शेती घटकाच्या मार्गदर्शक सूचनेतील (प्रपत्र - ९** प्रमाणे) हरितगृह / शेडनेटगृह उभारणीकरिता **सांगाड्याचे स्वतंत्र देयक व सिंचन सुविधा या घटकाचे स्वतंत्र** नोंदणीकृत वितरक/ सेवा पुरवठादाराचे देयक अनुदानाकरिता ग्राह्य धरण्यात येईल.

**ड) प्लास्टिक आच्छादन** या घटकाकरिता राज्यस्तरावर नोंदणीकृत उत्पादक (Manufacturer) व त्यांचे अधिकृत वितरक (Distributor) यांचेकडून लाभार्थ्यास पुरवठा केलेल्या साहित्याचे स्वतंत्र देयक अनुदानाकरिता ग्राह्य धरण्यात येईल.

www.MHAlerts.com

२५.हरितगृह/शेडनेटगृहाची कामे पुर्ण झाल्यानंतर सादर केलेली **देयके GST नंबर सहीत** असावेत. देयकामध्ये साहित्याचे BIS मानांकन प्राप्त उत्पादक कंपनीचा तपशील मॉडेलनिहाय वापरण्यात आलेल्या साहित्याचा तपशील नमुद करावे.

२६.हरितगृह/शेडनेटगृह उभारणीसाठी गुणवत्तापुर्ण साहित्य पुरवठा होण्याच्या दृष्टीने सेवा पुरवठादार यांच्या **फर्म /वर्कशॉप युनिटची पाहणी वर्षातुन एकदा मा.संचालक, (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे कार्यालयामार्फत** करण्यात येईल.

२७.शेडनेटगृह/ हरितगृह उभारणीपश्चात लाभार्थी शेतक-यांची कामाची गुणवत्ता व सुरळीत परिचलना संदर्भात तक्रार असल्यास तिचे वेळीच निराकरण करुन देण्यास तसेच लाभार्थी शेतक-यांनी याबाबत विभागाकडे तक्रार केल्यास कृषि विभागाच्या निर्देशाप्रमाणे उभारणी केलेल्या हरितगृह/शेडनेटगृहामध्ये योग्य त्या तांत्रिक सुधारणा करुन देण्यास सेवा पुरवठादार बांधील राहतील.

२८.नोंदणीच्या वेळी खोटी माहिती दिल्यास तसेच लाभार्थ्यांना हरितगृह/ शेडनेटगृह उभारणी करताना योजनेच्या मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक व इतर सर्व निकषाचे पालन न केल्यास कंपनी / सेवा पुरठादाराची नोंदणी रद्द करुन त्यांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेच बँक गॅरंटी जप्त करण्यात येईल.

२९. मा.संचालक, (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत सर्व अटी/ शर्तींची पूर्तता करणा-या सेवा पुरवठादारास नोंदणी क्रमांक देण्यात येईल.



More info: MHAlerts.Com

३०. **पूर्वीच्या नोंदणीकृत सेवा पुरवठादारांना नुतनीकरण करावयाचे आहे त्यांना उपरोक्तप्रमाणे अटी व शर्ती लागू राहतील त्याचबरोबर पुढीलप्रमाणे कागदपत्रे / अहवाल सादर करणे अनिवार्य करण्यात येत आहे.**

१. त्रैमासिक अहवाल (प्रपत्र - ६) (१ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीकरिता स्वतंत्र त्रैमासिक अहवाल सादर करावेत.)

२. स्टॉक रजिस्टर (प्रपत्र - ७) (१ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीकरिता स्टॉक रजिस्टर सादर करावेत.)

३. योजनेंतर्गत हरितगृह व शेडनेटगृह उभारणी केलेल्या देयकाबाबतचे जीएसटी भरणा केलेल्याचे विवरण पत्र /कागदपत्रे (जीएसटी रिटर्न) / जीएसटी क्लियरन्स सर्टिफिकेट सादर करावेत. (त्रैमासिक)

४. मागील वर्षी देण्यात आलेला नोंदणी आदेश

३१. **राज्यस्तरावरील नोंदणी / नूतनीकरणाचे प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार तसेच अंतिम निर्णय संचालक, (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे या कार्यालयास असेल.**

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

## प्रपत्र - १
## सेवा पुरवठादाराने नूतनीकरण व नोंदणीसाठी करावयाचा अर्ज

| | | |
|---|---|---|
| १ | सेवा पुरवठादार कंपनी/ फर्म/ संस्थेचे नाव | |
| २ | कंपनी/ फर्म/ संस्था सुरु केल्याचा दिनांक | |
| ३ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | |
| ४ | कंपनी/फर्म/संस्थेचा प्रकार | प्रोप्रायटरी/ भागीदारी/ प्रायव्हेट लिमिटेड/ पब्लीक लिमिटेड/ इतर |

| | | | नाव | पदनाम | मो.नंबर |
|---|---|---|---|---|---|
| ५ | **जबाबदार पदाधिका-यांची नावे**<br>अ.चेअरमन/मुख्य कार्यकारी अधिकारी /व्यवस्थापकीय संचालक/ प्रायव्हेट /पब्लीक लिमिटेड कंपनीच्या बाबत संचालक मंडळातील संचालक यांची माहिती.<br>ब. भागीदारी संस्थेबाबत संस्थेच्या सर्व भागीदारांची माहिती<br>क. प्रोप्रायटरी फर्मच्याबाबत प्रोप्रायटरची माहिती | १ | | | |
| | | २ | | | |
| | | ३ | | | |
| | | ४ | | | |
| | | ५ | | | |
| | | ६ | | | |
| | | ७ | | | |
| | | ८ | | | |

| | | |
|---|---|---|
| ६ | शॉप ॲक्ट/उदयोग आधार /उद्यम नोंदणी | क्रमांक - ................... दिनांकः- ................. |
| ७ | जीएसटी नोंदणी क्र. | |
| ८ | पॅन कार्ड नंबर | |
| ९ | ईमेल आयडी | |
| १० | वेबसाईट नाव (असल्यास) | |

| | | अ.क्र | नाव | हुद्दा | मो.नंबर | शैक्षणिक पैंत्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | तांत्रिक मनुष्यबळ तपशील | १ | | | | | |
| | | २ | | | | | |
| | | ३ | | | | | |
| | | ४ | | | | | |
| | | ५ | | | | | |

**यासोबत (प्रपत्र -२) प्रमाणे कागदपत्रे जोडण्यात येत आहेत-**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त सर्व माहिती ही खरी व बरोबर आहे तसेच वरील माहिती चुकीची किंवा खोटी आढळल्यास कंपनी/ फर्म/ संस्थेस देण्यात आलेली नोंदणी रद्द करण्यात येवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची निम्नस्वाक्षरीतांना संपूर्ण जाणीव आहे.

**दिनांक :**

शिक्का

**स्वाक्षरी**
**सक्षम प्राधिका-याचे नावः-**
**पदः-**

www.MHAlerts.Com



More info: MHAlerts.Com

## प्रपत्र - २

## आवश्यक कागदपत्राची सुची

हरितगृह/ शेडनेटगृह उभारणी करणा-या सेवा पुरवठादार यांनी राज्यस्तरावर **नोंदणीचे / नूतनीकरणाचा प्रस्ताव** सादर करताना पुढीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे संबंधित सेवा पुरवठादाराने सादर करावेत.

| अ.क्र | तपशिल | सादर केले | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | **विहीत नमुन्यातील अर्ज** | आहे/नाही | |
| २ | सेवा पुरठादाराने नोंदणी अर्जासोबत द्यावयाचे हमीपत्र | आहे/नाही | |
| ३ | जी.एस.टी.एन.नोंदणी प्रमाणप्रत्र आणि पॅनकार्ड कॉपी | आहे/नाही | |
| ४ | शॉप ॲक्ट/ उदयोग आधार /उद्यम नोदंणी /एसएसआय/उद्योग संचालकाकडील प्रमाणपत्राची छायांकीत प्रत | आहे/नाही | |
| ५ | मागील तीन वर्षाचा सनदी लेखापालाने प्रमाणित केलेला आर्थिक ताळेबंद (Balance Sheet) | आहे/नाही | |
| ६ | **IS 1161 : 2014 (As per BIS Amendment No.2) नुसार जीआय पाईपचे अधिकृत वितरक/ विक्रेता असल्याचे नोंदणीकृत उत्पादक / राज्य वितरकाचे प्रमाणपत्र** | आहे/नाही | |
| ७ | **टेपनेट (IS:16008 (Part 1): 2016), मोनोनेट (IS:16008 (Part 1I): 2016), इन्सेक्ट नेट (IS:16513:2016), पॉली फिल्म (IS-15827:2019) व ॲप्रॉन पेपरचे अधिकृत वितरक/ विक्रेता असल्याचे नोंदणीकृत उत्पादक / राज्य वितरकाचे प्रमाणपत्र** | आहे/नाही | |
| ८ | बँक गॅरंटी मूळ प्रत | आहे/नाही | |
| ९ | जीएसटी रिटर्न्स / जीएसटी क्लियरन्स सर्टिफिकेट (त्रैमासिक) | आहे/नाही | |
| १० | त्रैमासिक अहवाल (प्रपत्र - ६) (१ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५) | आहे/नाही | |
| ११ | स्टॉक रजिस्टर (प्रपत्र - ७) (१ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५) | आहे/नाही | |

www.MHAlerts.com

More info: MHAlerts.Com

## प्रपत्र - ३

## राज्यस्तरीय नोंदणीकरिता सादर केलेल्या माहितीचे संक्षिप्त विवरण

१) राज्यस्तरीय नोंदणी करीता बँक गॅरंटी मूळ प्रत तपशील

| अ.क्र. | बँकेचे नाव व शाखा | रक्कम | बँक गॅरंटी क्रमांक | वैधता कालावधी | बँक गॅरंटी मूळ प्रत | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

www.MHAlerts.Com



More info: MHAlerts.Com

प्रपत्र - ४

बँक गॅरंटी नमूना

(For New Registration Rs.3.00 Lakh BG / For Renewal Rs.2.50 Lakh BG)

To,

------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

## BANK GUARANTEE

WHEREAS ________________________________________, (hereinafter called as **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune)** have approved **M/s** ________________________________________ (hereinafter called firm) for the supplies of **Polyhouse (OVPH & CCPH) and Net house (FTNH, RTNH, CPNH)** (hereinafter called the said goods) under the Polyhouse and Shadenet house Scheme (hereinafter called the said scheme)

**AND WHEREAS** in pursuance and under the terms of the said approved of the firm, firm has agreed to furnish in favour of the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** the Bank Guarantee for a **sum of Rs.2,50,000/- (Rupees Two lakh Fifty Thousand only)** for the due performance of his/her its obligation to the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** under the **terms and conditions of Govt. of Maharashtra and circular as when Govt. and Dept. have issued.**

We, ________________________________________ (hereafter called the bank) hereby irrevocably and un-conditionally undertake and guarantee payment to **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** forthwith on demand being made by **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** in writing without dumur any and all monies anywise payable by firm, as may be specified in the notice of the demand made by the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** to the bank upto an aggregate a sum of Rs.2,50,000/- (Rupees Two lakh Fifty Thousand only)and the **bank here by agree and undertake to the Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune that**

**1.** The firm will have to give complete material to the farmers as mentioned in the bill invoice in quantity and quality as per the **BIS Specifications** given in **Protected Cultivation Guideline 2025-26 and Cable Post Net house Guideline-2021-22. (with prescribed guarantee and warranty of materials),** alongwith installation of Polyhouse and /or Net house work .

2. In consideration interalia of the firm paying to the guarantor the guarantee charges and executing requisites documents in favour of the bank and which have been done prior to the execution hereof and the request of the firm, the Bank hereby agree with **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune, THAT** in the event of **any default and / or defaults being committed by the firm** in payment to the firm of the Rs.2,50,000/- (Rupees Two lakh Fifty Thousand only) and or any part thereof the Bank hereby irrevocably unconditionally and or without any demur and not withstanding any intimation and or direction by the firm to the contrary guarantee and convenients to pay to the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, IN PUNE** the said sum **Rs.2,50,000.00 (Rupees Two lakh Fifty Thousand only)** and or any part thereof as the case may be.

3. The **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** shall be entitle to act under the terms hereof as if the Bank was the **Principal Deptor to the Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** for payment of any amount upto the said sum of Rs.2,50,000/-

www.MHAlerts.Com
More info: MHAlerts.Com

(Rupees Two lakh Fifty Thousand only) guarantee by the Bank aforesaid to the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune.**

4. The guarantee is additional and without prejudice to any security of obligations which **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** may now of hereafter have from the firm and or any other person in respect of the said indebtness and or liabilities and or obligations hereby guaranteed and all rights and remedies in respect thereof are hereby reserved by the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** in its favour.

5. The guarantee contained herein is irrevocable and unconditional shall be continuing guarantee and shall remain in force for a period of **ONE YEAR (12 months) with effect from the date of guarantee**. On the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** serving on the bank notice of claim under this guarantee before the expiry of the said period, the same shall be enforceable against the bank not with standing the fact that the same is payable after expiry of the said period.

6. The guarantee shall be continuing guarantee and shall not be considered as wholly or partially satisfies or exhaust by any payments from time to time made by the Bank or the distributor or any settlements of the accounts between the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** and the firm.

7. The bank shall make the payment to the firm at the time or from time to time a sum not exceeding in aggregate the said sum of Rs.2,50,000/- (Rupees Two lakh Fifty Thousand only) unconditionally and without any demur and irrespective of any instructions or directions given by the firm to the bank to without payment thereof or any ground whatsoever. The bank obligations of the bank in terms hereof shall not be anywise affected or suspended by reason of dispute (if any) having been raised by the firm (whether of not pending before any Arbitrator Office, Tribunal or Court) or any denial of liability by the firm stopping or preventing or purporating to stop or prevent any payment by the Bank of **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** in terms thereof.

8. The bank hereby further agrees with declares and undertake to **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** that his guarantee is and shall always be unconditional irrevocable and absolute till guaranteed amount hereunder have been paid in full to the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** irrespective of any dispute of difference as to any liability of the firm under the said G.R. or invalidity, enforceability, illegality or otherwise of any terms, conditions or provision for the said G.R. between the firm and the **Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune** or otherwise.

9. This guarantee shall be determined of affected by the liquidation or winding up, dissolution of change of constitution or insolvency of the firm or change in the constitution of either the firm or bank but shall in respect and for all purposes be **binding and operative until satisfactory performance of all the obligations by the firm towards Assistant Director, Account – 01, Commissionerate of Agriculture, Pune.**

**10. Not with standing anything contained here in :**

**a) Our liability under this guarantee shall not exceed Rs.2,50,000/- (Rupees Two lakh Fifty Thousand only)**

**b) Bank Guarantee (BG) No and Date of Issue** ____________________

**c) The guarantee shall be valid up to** ____________________

**d) We are liable to pay the guaranteed amount or any part thereof under this guarantee only and only if you serve upon us a written claim of demand on or before ____________ (inclusive of claim period of three months).**

www.MHAlerts.Com



More info: MHAlerts.Com

## प्रपत्र - ५

## सेवा पुरवठादाराने नोंदणी अर्जासोबत द्यावयाचे हमीपत्र (५००/- रुपयांच्या स्टँम्प पेपरवर)

मी श्री./श्रीमती :------------------------------------------------------------------- प्रोप्रा./चेअरमन/ कार्यकारी संचालक/व्यवस्थापकीय संचालक/संचालक/प्राधिकृत पदाधिकारी.................................................. (कंपनी/फर्म/संस्थेचे नाव) रा. .................... ता. ............................... जि. ..............................

उपरोक्त संस्थेच्या नावे हरितगृह/शेडनेटगृह/ केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह उभारणीसाठी नोंदणी करण्यासाठी अर्ज करीत आहे. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळामार्फत निर्गमित **संरक्षित शेती मार्गदर्शक सूचना २०२५-२६ आणि केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह मार्गदर्शक सूचना २०२१-२२** उभारणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना/ अंमलबजावणी सूचना मी अवगत केल्या असून त्यानुसार उपरोक्त संस्थेच्या वतीने संस्थेचा सक्षम पदाधिकारी या नात्याने मी खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून देत आहे.

१. आमची कंपनी/ फर्म/ संस्था जीएसटी नोंदणीकृत असून शॉप ॲक्ट प्रमाणपत्र/ उद्योग आधार/ उद्यम संचालकाकडील नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त आहे.

**२. आम्हास हरितगृह/शेडनेटगृह उभारणीची दोन किंवा दोन वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे.(अनुभवी अर्जदारास)**

३. हरितगृह /शेडनेटगृह/ केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह उभारणीच्या अंमलबजावणी सूचना/मार्गदर्शक सूचनेत नमुद मॉडेलनिहाय डिझाईनप्रमाणे व तांत्रिक निकषाप्रमाणे साहित्य वापरुन (योजनेत निवड झालेल्या लाभार्थ्यांना) करुन देण्याची याद्वारे आम्ही हमी घेत आहोत.

**४. हरितगृह /शेडनेटगृह/ केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह सांगाडयाची गुणवत्ता/दर्जाबाबत आम्ही पाच वर्षाची वॉरंटी देत आहोत. नैसर्गिक आपत्ती, गुंडगिरी व तत्सम कारणे वगळून सांगाडयाची हानी/ना दुरुस्ती झाल्यास आम्ही त्याची आमच्या खर्चाने दुरुस्ती करुन देवू.**

**५. पॉली फिल्म /शेडनेट (टेपनेट/मोनोनेट) / इन्सेक्टनेट/ ॲप्रॉन पेपर इत्यादी साहित्य आम्ही बीआयएस मानांकनाप्रमाणे व तांत्रिक निकषाप्रमाणे पुरवठा करु तसेच पॉली फिल्म, नेट (सर्वप्रकारच्या नेट) व ॲप्रॉन पेपर बाबत आम्ही एक वर्षाची गॅरंटी (बदलून देणे) व दोन वर्षाची वॉरंटी (आमच्या खर्चाने दुरुस्त करुन देणे) देत आहोत. नैसर्गिक आपत्ती, गुंडगिरी व तत्सम कारणांचा यास अपवाद राहील.**

६. हरितगृह / शेडनेटगृहाच्या उभारणीकरिता वापरण्यात येणारे जीआय पाईप, पॉली फिल्म, टेपनेट, मोनोनेट, इन्सेक्ट नेट, ॲप्रॉन पेपर, ॲल्युमिनिअम प्रोफाईल, सिंचन सुविधेंतर्गत ठिबक सिंचन, फॉगिंग यंत्रणा व वैकल्पिक साहित्य या घटकांचे **शेतक-यास अनुदान अदायगी केल्यानंतर साहित्य स्थलांतर करणे, साहित्याची विल्हेवाट लावणे, विक्री करणे, जुने साहित्य उभारणीकरिता वापरणे व दुरुपयोग करणे, योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांना खोटी देयके देणे व शेतक-यांची दिशाभूल / फसवणूक करणे असे कृत्य मी केल्याचे निदर्शनास आल्यास सेवा पुरवठादार म्हणून माझी फर्म काळ्या यादीत टाकण्यात येईल व प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेऊन भारतीय दंड संहितेनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल याबाबत मला जाणीव आहे.**

www.MHAlerts.com
More info: MHAlerts.Com

७. हरितगृह /शेडनेटगृह/ केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह उभारणीपश्चात लाभार्थी शेतक-यांची कामाची गुणवत्ता व सुरळीत परिचलना संदर्भात तक्रार असल्यास तिचे माझ्या स्तरावर वेळीच निराकरण करुन देण्यास बांधील राहील. लाभार्थी शेतक-यांनी याबाबत विभागाकडे तक्रार केल्यास कृषि विभागाच्या निर्देशाप्रमाणे उभारणी केलेल्या निर्देशाप्रमाणे हरितगृह / शेडनेटगृह / केबल ॲण्ड पोस्ट प्रकारच्या शेडनेटगृहामध्ये योग्य त्या तांत्रिक सुधारणा करुन देण्यास बांधील राहील.

८. तसेच **माझी फर्म सेवा पुरवठादार म्हणून काळ्या यादीत समाविष्ट नसलेबाबतची हमी मी देत आहे.**

९. **योजनेंतर्गत लाभार्थ्याच्या हरितगृह / शेडनेटगृहाची उभारणी मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केली असल्याबाबत व प्रकल्प कार्यान्वित करुन दिला असल्याबाबत विहित नमुन्यात प्रमाणपत्र सादर करील.**

१०. **हरितगृह / शेडनेटगृह उभारणीपश्चात / अनुदान वितरणपश्चात, लाभार्थीकडून अथवा माझ्या फर्मकडून उभारणी साहित्याची परस्पर विल्हेवाट / विक्री होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.**

**दिनांक :-**

**शिक्का**

**स्वाक्षरी :-**
**सक्षम प्राधिका-याचे नाव :-**
**पद :-**

www.MHAlerts.Com



More info: MHAlerts.Com

## प्रपत्र - ६

### हरितगृह / शेडनेटगृह / केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह उभारणी करणा-या नोंदणीकृत कंपनी / सेवा पुरवठादाराने सादर करावयाच्या कामाचा त्रैमासिक अहवाल

| अ.क्र | लाभार्थ्याचे नाव | गाव व तालुका | जिल्हा | संपर्क क्र. | बाब (हरितगृह/ शेडनेटगृह / केबल ॲण्ड पोस्ट प्रकारचे शेडनेटगृह) | क्षेत्र (चौ.मी.) | कामाची सद्यस्थिती (चालू /पूर्ण / प्रगतीत) | योजनेचे नाव (RKVY/ MIDH/ POCRA) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

www.MHAlerts.Com

सेवा पुरवठादार

सही व शिक्का

प्रति

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

-----------------------

प्रत : संबंधित तालुका कृषि अधिकारी

More info: MHAlerts.Com

# प्रपत्र - ७

हरितगृह / शेडनेटगृह / केबल अँण्ड पोस्ट शेडनेटगृह उभारणीसाठी लागणाऱ्या साहित्याचा साठा नोंदवही अहवाल

सेवा पुरवठादाराचे नाव व पत्ता

नोंदणी क्रमांक :-

दिनांक :-

| आवक | | | | | | | | | | | जावक | | | | | | | | | | | | | | | शिल्लक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्लॅडिंग मटेरियल | | | | | | | | | | | | | | | क्लॅडिंग मटेरियल | | | | | | | | | क्लॅडिंग मटेरियल | | | | | | | |
| अ.क्र. | डिसी नंबर | जीआय पाईप (IS : 1161) व 2.00 mm | पॉली फिल्म (IS : 15827) | टेपनेट (IS : 16008 Part I) | मोनोनेट (IS : 16008 Part II) | इन्सेक्ट नेट (IS : 16513) | ॲल्युमिनिअम प्रोफाईल | लॅमिनेटेड ओव्हन फिल्म (ॲप्रॉन पेपर) | केबल / वायर रोप | इतर साहित्य | शेतकऱ्याचे नाव व पत्ता | मोबाईल नंबर | हरितगृह / शेडनेटगृह / केबल अँण्ड पोस्ट शेडनेटगृहाचे क्षेत्र | डिसी नंबर तारीख | बील क्रमांक व तारीख | बील रक्कम | जीआय पाईप (IS : 1161) व 2.00 mm | पॉली फिल्म (IS : 15827) | टेपनेट (IS : 16008 Part I) | मोनोनेट (IS : 16008 Part II) | इन्सेक्ट नेट (IS : 16513) | ॲल्युमिनिअम प्रोफाईल | लॅमिनेटेड ओव्हन फिल्म (ॲप्रॉन पेपर) | केबल / वायर रोप | इतर साहित्य | जीआय पाईप (IS : 1161) व 2.00 mm | पॉली फिल्म (IS : 15827) | टेपनेट (IS : 16008 Part I) | मोनोनेट (IS : 16008 Part II) | इन्सेक्ट नेट (IS : 16513) | ॲल्युमिनिअम प्रोफाईल | लॅमिनेटेड ओव्हन फिल्म (ॲप्रॉन पेपर) | केबल / वायर रोप | इतर साहित्य |
| | | (किलो) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (मी.) | (चौ.मी.) | (मी.) | | | | | | | | (किलो) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (मी.) | (चौ.मी.) | (मी.) | | (किलो) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (चौ.मी.) | (मी.) | (चौ.मी.) | (मी.) | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 32 | 33 | 34 | 35 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

सेवा पुरवठादार

सही व शिक्का

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com